(36)

जागतिक बँक सहाय्यित "तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारचा कार्यक्रम" या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या शासकीय/अनुदानित संस्थांना शैक्षणिक स्वायतत्ता देणेबाबत.....
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. डब्ल्यूबीपी २००४/(३४१/०४)/(२)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक २९ मार्च,२००६

संदर्भ:- १) राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, नोएडा यांचे क्र.टिईक्युआयपी/एनएससी/ २००३/३००८, दिनांक ३ मार्च, २००३ चे पत्र.
२)राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, नोएडा यांचे क्रएमएचआर/ टीक्यू/ ०४/ ३९६४, दि.३ नोव्हेंबर, २००४.
३) शासन पत्र क्र. डब्ल्युबीपी २००२/(६८/०२)/व्यशि-५, दि.११ डिसेंबर, २००३.
४) शासन पत्र क्र. डब्ल्यूबीपी २००५/(७७६/०५)/तांशि-६ दि. ३० जून, २००५.
५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. डब्ल्युबीपी २००१ /(४७ / ०१)/ व्यशि-५, दिनांक १९ जुलै, २००२
६) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.डब्ल्युबीपी २००४ /(३४१ /०४) / (१)/तांशि-६, दिनांक ३१ मार्च, २००४

प्रस्तावना :-

जागतिक बँक सहाय्यित "तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारचा कार्यक्रम" राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये राबविण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ येथील राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, नोएडा यांच्या दि.३ मार्च, २००३ च्या पत्रान्वये ज्या संस्थांची निवड केली आहे, त्यामध्ये वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली या संस्थेचा समावेश आहे.

सदर कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी संस्था संपूर्णत: स्वायत्त असणे ही एक प्रमुख अट आहे. यासाठी संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील शासन पत्रांन्वये , या संस्थेस सदर कार्यक्रमांतर्गत अभिप्रेत असलेली स्वायत्तता प्रदान करण्याबाबत संबंधित विद्यापीठास तथा विद्यापीठ अनुदान आयोगास सूचित करण्यांत आले होते. तथापि, सदर संस्थेस या कार्यक्रमांतर्गत अभिप्रेत असलेली स्वायत्तता देण्याबाबत विद्यापीठाकडून अद्याप अंतिम कार्यवाही झाली नसल्याने या संस्थेस स्वायत्तता देण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- जागतिक बँक सहाय्यित "तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारचा कार्यक्रम" या कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या संस्थांना, सदर कार्यक्रमांतर्गत अभिप्रेत असलेली स्वायत्तता दिल्याशिवाय हा कार्यक्रम राबविता येणे शक्य नसल्यामुळे वालचंद अभियांत्रिकी

Walchand College of Engineering
Regd. No. 82
17 APR 2006

महाविद्यालय, सांगली या संस्थेतील पदवी विभागास या कार्यक्रमांतर्गत अभिप्रेत असलेली स्वायत्तता, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील कलम ८, पोटकलम ४ अन्वये प्रदान करण्यांत येत आहे. परंतु सदर संस्थेतील पदविका विभाग पूर्वीप्रमाणेच शासनाच्या अनुदानासह महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाच्या अधिन कार्यरत राहील. पदविका विभागाचे कामकाज स्वतंत्रपणे चालविण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत संबंधित संस्थेने आवश्यक कार्यवाही करावी.

या स्वायत्ततेच्या अधिन राहून, पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्र संबंधित विद्यापीठ प्रदान करेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मनीषा शिंत्रे)-
उपसचिव ,महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मां.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय. मुंबई
५) मा.राज्यमत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई
७) सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
८) सचिव, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली
९) सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली
१०) संचालक, राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, नोएडा (युपी)
११) संचालक, टेक्नीकल टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, भोपाळ
१२) संचालक, ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन, नवी दिल्ली
१३) संचालक, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई
१४) संचालक, टाटा इन्स्टिटयुट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई
१५) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्राल, मुंबई
२०) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
२२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे .
२४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५) संचालक, ग्रंथालय , महाराष्ट्र राज्य, मुंबई
२६) संचालक, कला, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२७) कुलसचिव, सर्व विद्यापीठे